दैनिक
जनप्रवास
बातम्यांचा राजा

ूर ▶ शुक्रवार, दि. ३१ ऑक्टोबर २०२५

# पुरुषोत्तम करंडक स्पर्धेचे आज उद्घाटन

**जनप्रवास : कोल्हापूर**

पुण्यातील महाराष्ट्रीय कलोपासक, गायन समाज देवल क्लब आणि शिवाजी विद्यापीठातील संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेचे आयोजन केले आहे. प्राथमिक फेरीचे उद्घाटन ३१ अॅक्टोबर रोजी सकाळी ९ वाजता कोल्हापूर केंद्रावर देवल क्लबमधील गोविंदराव टेंबे रंगमंदिरमध्ये होणार आहे.

एकांकिका स्पर्धेत पहिल्यांदा इचलकरंजी येथील श्री व्यंकटेश महाविद्यालयाचे मागे वळून बघू नकोस, कोल्हापुरातील भारती विद्यापीठ अभियांत्रिकी महाविद्यालयाचे 'हमको हिन्दी नही आती,' इस्लामपूर येथील राजारामबापू अभियांत्रिकी महाविद्यालयाचे 'एका लेखनाची अर्धवट राहिलेली गोष्ट,' इचलकरंजीतील नाईट कॉलेजचे तमाशा, कोल्हापुरातील विवेकानंद कॉलेजचे लेबल एकांकिका सादर होणार आहेत. तसेच शनिवार १ नोव्हेंबपर रोजी कोल्हापुरातील कसबा बावडा येथील डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीचे इ दिनगुलिओ केते जाबे, बुधगाव येथील पद्मभूषण वसंतराव दादा पाटील इन्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी महाविद्यालयाचे 'स्काय वॉक', सांगलीतील चिंतामणीराव व्यापार महाविद्यालयाचे 'अव्यक्त', डी. वाय. पाटील स्कूल ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड मॅनेजमेंटचे 'मिठाई,' इचलकरंजीतील दत्ताजीराव कदम आर्टस, सायन्स अँड कॉमर्स कॉलेजचे 'कुपन', शिवाजी विद्यापीठातील डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजीचे 'अ युजलेस जीनियस' या एकांकिकेचे सादरीकरण होणार आहे.

# कोल्हापुरात आजपासून पुरुषोत्तम करंडक एकांकिका स्पर्धेस प्रारंभ

**कोल्हापूर** : पुरुषोत्तम करंडक आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेच्या प्राथमिक फेरीला शुक्रवार (दि.३१) पासून प्रारंभ होणार आहे. देवल क्लबच्या गोविंदराव टेंबे रंगमंदिरात २ नोव्हेंबरपर्यंत रसिकांना २६ एकांकिकांची पर्वणी मिळणार आहे. सकाळी ९ ते १ व दुपारी ४ ते ८ यावेळेत सादरीकरण होणार आहे.

**स्पर्धेतील एकांकिका अशा...**

शुक्रवारी सकाळी ९ ते १ : श्री व्यंकटेश महाविद्यालय, इचलकरंजी (मागे वळून बघू नकोस), भारती विद्यापीठाचे अभियांत्रिकी महाविद्यालय (हमको हिंदी नही आती!), राजारामबापू अभियांत्रिकी महाविद्यालय, ईश्वरपूर (एका लेखकाची अर्धवट राहिलेली गोष्ट), नाईट कॉलेज, इचलकरंजी (तमाशा), विवेकानंद कॉलेज (लेबल).

दुपारी ४ ते ८ : डॉ. डी. वाय. पाटील इंजिनिअरिंग कॉलेज (सवारी भवानी चौकामध्ये), कर्मवीर भाऊराव पाटील मॅनेजमेंट स्टडिज अँड रिसर्च, सातारा (नवरा नको गं बाई), आर्टस् व कॉमर्स महाविद्यालय, नागठाणे (सोयरीक), गोविंदराम सक्सेरियन विज्ञान महाविद्यालय, बेळगाव (असं हे असे लिहावे), - डॉ. डी. वाय. पाटील पॉलिटेक्निक (गरम चाय की प्याली),राजारामबापू अभियांत्रिकी महाविद्यालय, ईश्वरपूर (हाफवे).